# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
## कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

कुलसचिव

सूचना का अधिकार

दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२


वाचा : १) उप सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. एमसीएम-२०२४/प्र.क्र.२२६/निवडणूक/कार्या-३३, दिनांक ५ मार्च, २०२४.

२) अप्पर जिल्हाधिकारी तथा नोडल अधिकारी आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी पथक, अकोला यांचे पत्र क्र. आचारसंहिता कक्ष/लो.स.नि./कावि-३३७/२०२४, दिनांक ११ मार्च, २०२४.

## परिपत्रक

क्र. साप्रवि/जीजी-१/परिपत्रक/आचारसंहिता/४४६९/२०२४ दिनांक : १९/०३/२०२४

मा. वरिष्ठ प्रधान सचिव, भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र No. 437/6/INST/ECI/FUNCT/MCC/2024 (MCC Enforcement), दिनांक ०२/०१/२०२४ अन्वये आदर्श आचार संहितेची अंमलबजावणी- कार्य करावे आणि काय करू नये याबाबत निर्देश दिलेले आहेत. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने लागू झालेल्या आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत अवलंबावयाच्या कार्यपध्दतीबाबत विविध विषयासंबंधित सूचना प्रसिध्द केलेल्या असुन मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय मार्फत संदर्भिय दिनांक ०५/०३/२०२४ रोजीचे पत्र निर्गमित केलेले आहे. तसेच संदर्भ क्र. २ नुसार अप्पर जिल्हाधिकारी तथा नोडल अधिकारी आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी पथक, अकोला यांनी याबाबत निर्देश दिलेले आहेत.

करीता विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी, आहरण व संवितरण अधिकारी, कार्यालय प्रमुख तसेच सर्व अधिकारी यांना कळविण्यात येते की, आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत सदर आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता आपल्या स्तरावरुन घेण्यात यावी. आदर्श आचारसंहितेच्या काळात निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी घेण्यात यावी. तसेच आपल्या कार्यालयात व परिसरात राजकीय नेत्यांची छायाचित्रे / जाहिरात / पोस्टर्स, बॅनर्स, होडींग्ज असल्यास विनाविलंब काढून टाकण्याची कार्यवाही तात्काळ आपल्या स्तरावर करण्यात यावी.

सुलभ संदर्भाकरीता पत्राची प्रत यासह संलग्न करण्यात येत आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी व सोबतच्या प्रपत्रात माहिती भरुन या कार्यालयास सादर करण्यात यावी.

(सुधीर राठोड)
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

सोबत : वरीलप्रमाणे

**प्रतिलीपी :**

१) संचालक (सर्व) ----------
२) अधिष्ठाता (सर्व) ----------
३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) ----------
४) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) ----------
५) प्रभारी अधिकारी (सर्व) ----------
६) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell) यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

(कृ.म.पहा.)

७) विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) ----------------------------------------

८) विद्यापीठ नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी

९) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि.)

१०) सहायक कुलसचिव (आस्थापना/साप्रवि/परिक्षा/समिती/प.शि.सं./कृ.म.वि./उ.वि.म./व.वि.म./कृषि अभि./ कृ.जै.महा./ अ.तं.महा.) ---------------------

११) सहायक नियंत्रक (अंदाजपत्रक/मुख्यालय)/अधिदान व लेखाधिकारी (अकोला व नागपूर)

१२) मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक / तांत्रिक सचिव यांना माहितीकरीता सादर.

१३) मा. कुलसचिवांचे स्वीय सहायक यांना माहितीकरीता सादर.

१४) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

१५) ----------------------------------------------------------------------------------------------------

682
20/3/24

(42) ॥ C/27

# अपर जिल्हाधिकारी अकोला यांचे कार्यालय अकोला

Email ID- adc_akola@rediffmail.com दूरध्वनी क्र.0724-2432153

जा.क्र.आचारसंहिता कक्ष/लो.स.नि./कावि -৬३७/ 2024 दिनांक : 11 /03/2024

लोकसभा सार्वत्रिक निवडणुक-2024/महत्त्वाचे

<u>आदर्श आचारसंहिता</u>

प्रति,

1. उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणुक निर्णय अधिकारी ~~28-अकोट/29-बाळापुर/ /31-अकोला पुर्व/ 32-मुर्तिजापुर/33 रिसोड~~
2. सहायक निवडणुक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी महसुल जि.का. अकोला 30-अकोला पश्चिम यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव
3. तहसिलदार, अकोला/अकोट/तेल्हारा/बाळापूर/पातूर/मुर्तीजापूर/बार्शिटाकळी
4. ~~..........~~ कुलसचिव डॉ.पं.दे.कृषि विद्या. अकोला (सर्व विभाग प्रमुख)

विषयः- <u>लोकसभा सार्वत्रिक निवडणुक-2024</u>

**Immediate action to be taken for enforcement of Modal Code of Conduct after announcement of General Elections-----------------**

**संदर्भः मा. निवडणुक आयोगाचे पत्र क्र.437/6/1/ECI/INST/FUNCT/MCC/2023 दिनांक 09 ऑक्टोबर, 2023**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, भारत निवडणुक आयोगाकडून आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची लवकरच घोषणा होणार आहे. त्या अनुषंगाने संदर्भीय पत्रात संपत्तीचे विद्रुपीकरण बाबत खालीलप्रमाणे विहीत कालावधीत कार्यवाही करण्याचे निर्देश आहेतः-

अ. **<u>शासकीय संपत्तीचे विद्रुपीकरणः-</u>** यामध्ये सर्व शासकीय कार्यालये आणि कॅम्पस मधील सर्व कार्यालयीन इमारती यांचा समावेश होतो. शासकीय संपत्तीच्या भिंतीवरील लेखन, पोस्टर्स/पेपर्स किंवा कटआऊट/ होर्डीग्ज/बॅनर्स/ झेंडे इत्यादी निवडणुका जाहीर झाल्यानंतर **<u>24 तासामध्ये</u>** काढुन टाकण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.

आ. **<u>शासकीय संपत्तीचे विद्रुपीकरण व सार्वजनिक जागेचा गैरवापरः-</u>** यामध्ये सार्वजनिक संपत्तीच्या भिंतीवरील लेखन, पोस्टर्स/पेपर्स किंवा कटआऊट/ होर्डीग्ज/बॅनर्स/ झेंडे इत्यादी आणि सार्वजनीक ठिकाणी जसे रेल्वे स्टेशन, बसस्टॅन्ड, विमानतळ, रेल्वेपुल, रस्ते, शासकीय बसेस, ईलेक्ट्रीक/ टेलीफोन, खांब, नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इमारती येथील अनधिकृत राजकीय जाहिराती निवडणुका जाहीर झाल्यापासुन **<u>48 तासात</u>** काढुन टाकण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.

REGISTRAR OFFICE
DR. P.D.K.V., AKOLA
15 MAR 2024
In. No. 12127

Estt./Comm./Exam./CAD
त्वरीत संबंधितांना पाठवाने 18/3

इ. **खाजगी संपत्तीचे विद्रुपीकरणः-** खाजगी संपत्तीवरील सर्व अनाधिकृत राजकीय जाहिराती निवडणुका जाहीर झाल्यापासुन **72 तासामध्ये** काढुन टाकण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.

ई. **शासकीय कार्यालयांच्या अधिकृत वेबसाईटवरील राजकीय नेत्यांची छायाचित्रे काढून टाकणेबाबतः-** आचारसंहिता जाहीर होताच शासकीय कार्यालयांच्या अधिकृत वेबसाईटवरील राजकीय नेत्यांची/मंत्र्याची/पक्षांची छायाचित्रे काढून टाकण्याची कार्यवाही त्वरीत करावी.

उ. **विकासकाम/बांधकामाबाबत करावयाची कार्यवाहीः-** याबाबत **72 तासांचे** आत खालील बाबींची माहिती सादर करणे आवश्यक आहे

1. निवडणुक घोषीत होण्यापुर्वी विकासात्मक कार्याचा कार्यादेश देण्यात आला असेल व काम प्रत्यक्षपणे सुरु झाले असेल त्या कामाबाबतची माहिती
2. निवडणुक घोषित होण्यापुर्वी विकासात्मक कार्याचा कार्यादेश देण्यात आला असेल व परंतू प्रत्यक्षपणे काम सुरु झालेले नसेल त्या कामाबाबतची माहिती.

उपरोक्त माहिती मा. निवडणूक आयोगास विहित केलेल्या कालमर्यादेत सादर करावयाची असल्याने याबाबत पूर्वतयारी करुन ठेवण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या पत्रासोबत संलग्न केलेल्या विहीत नमुन्यात अहवाल या कार्यालयास न चुकता करावा. तसेच संदर्भीय पत्राची प्रत यासोबत संलग्न केलेली आहे.

**(रामदास दे. सिध्दभट्टी)**
**अपर जिल्हाधिकारी तथा नोडल**
**अधिकारी आदर्श आचारसंहिता अंमलबाजावणी**
**पथक, अकोला**

सहपत्रः- विहीत प्रपत्र

0129

| | | |
|---|---|---|
| लोकसभा सार्वत्रिक निवडणुक -2024 | | |
| पोस्टर्स, बॅनर्स, होर्डीग्ज, मालमत्ता विद्रुपीकरण इत्यादीबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती सादर करावयाचा नमुना | | |
| अकोला जिल्हा | | दिनांक:- |
| अ. क्र | तपशील | निवडणुक जाहीर झाल्याबरोबर काढुन टाकलेले किंवा मिटविलेले संख्या (केलेली कार्यवाही) |
| 1 | शासकीय कार्यालये 24 तास | |
| 2 | सार्वजनिक कार्यालये 48 तास | |
| 3 | व्यक्तीगत ठिकाणे 72 तास | |
| 4 | कार्यालयीन वेबसाईटवरुन राजकीय व्यक्तींची माहिती व फोटो काढणे | |